# गप्पात रंगले 'विदेश संचार' चे मित्र

प्रकाशित: महाराष्ट्र टाइम्स ३१ मार्च २०१५

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# गप्पात रंगले 'विदेश संचार' चे मित्र

साधारण जानेवारी उजाडला की आम्हा विदेश संचार सेवा/विदेश संचार निगम लिमिटेड च्या सेवा निवृत्त कर्मचा–यांचे मोबाईल वाजू लागतात. सर्वांचा एक मेकास एकच प्रश्न असतो, स्नेह मेळावा कधी व कोठे आहे ? आमचेसाठी स्नेह मेळावा एक पर्वणीच असते. वर्षातून एकदा सर्वांनी एकत्र भेटायचे. गप्पा गोष्टी करायच्या, आपली सुख दु:खे आपसात वाटून घ्यायची. जुन्या गोष्टींना, आठवणींना पुन्हा नव्याने उजाळा द्यायचा व पुन्हा भुतकाळात रमायचे. दिवस आनंदात घालवायचा हा स्नेहमेळाव्याच मुख्य उद्देश. असा हा स्नेहमेळावा नुकताच हिंजवडी येथे डी.व्ही.सुबय्या यांच्या नियोजनात झाला. विशेष म्हणजे सुब्बय्या यांनी कोणाकडून एक पैशाची मदत न घेता स्नेह मेळाव्याचा सर्व अर्थिक भार उचलला. कार्यक्रमाचे आयोजन विदेश संचारचे माजी सेवानिवृत्त कर्मचारी एस.व्ही. उदास, अशोक कानिटकर, निजाम तांबोळी, एस.एस.वेदपाठक तसेच अंकूश बागल या उत्साही मंडळींनी केले. कार्यक्रमास फार छान प्रतिसाद मिळाला. सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. पी.जी.सरपोतदार, व पी. एम. नारखेडे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. वर्षभरात दिवंगत झालेल्या कर्मचा–यांना श्रध्दांजली वाहून कार्यक्रमास सुरवात झाली. आर.एम.कुंभार, ए.व्ही. जॉर्ज, अशोक बनसोडे हे विदेश संचारचे माजी अधिकारीही उपस्थित होते.

अधिका-यांनी आपल्या भाषणातून भूतकाळातील आठवणीना उजाळा देत, त्यांना त्यांच्या कार्यकाळात सर्वांकडून कसे सहकार्य मिळाले व कार्यकाळ गोड कसा झाला हे थोडक्यात, मुद्देसुदपणे सांगितले. उपस्थितांनी पण आपली मनोगते प्रकट केली. या स्नेहमेळाव्यात भेटीगाठी व गप्पांव्यतिरिक्त इतर विषयावर पण चर्चा झाली. निजाम तांबोळी यांनी सूत्र संचालन केले. एस. जी. सिन्नरकर यांनी आभार प्रदर्शन केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या स्नेहमेळाव्याची एक वाखणण्या जोगी गोष्ट म्हणजे येथे उतारवयातील व्याधी, दु:ख, वेदना विसरून नुकतीच ह्रदय शस्त्रक्रीया झालेले कर्मचारी पण ५ मजले जिना चढून कार्यक्रमास उपस्थित होते. सकाळी घरच्या चिंतांनी त्रासून आलेली सर्व मंडळी संध्याकाळी कळी खुलावी किंवा शक्तीवर्धक डोस मिळाल्यावर चेहरा उजळावा तसा प्रसन्न, हसरा चेहरा घेउन परत पुढच्या स्नेहमेळाव्याला भेटण्याची उमेद ठेवत घरी परतले.






.S. / V.S.N.L.
red Employees
et-Together



# गप्पांत रंगले 'विदेश संचार'चे मित्र



साधारण जानेवारी महिला उजाडला की, आम्हा विदेश संचार सेवा-विदेश संचार निगम लिमिटेडच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे मोबाइल वाजू लागतात. सर्वांचा एकमेकांना एकच प्रश्न असतो, स्नेहमेळावा कधी व कोठे आहे ? आमच्यासाठी स्नेहमेळावा एक पर्वणीच असते. वर्षातून एकदा सर्वांनी एकत्र भेटायचे. गप्पा गोष्टी करायच्या, आपली सुख दुःखे आपसात वाटून घ्यायची. जुन्या गोष्टींना, आठवणींना पुन्हा नव्याने उजाळा द्यायचा व पुन्हा भूतकाळात रमायचे. दिवस आनंदात घालवायचा हा स्नेहमेळाव्याचा मुख्य उद्देश. असा हा स्नेहमेळावा नुकताच हिंजवडी येथे डी. व्ही. सुब्बय्या यांच्या नियोजनात झाला. विशेष म्हणजे सुब्बय्या यांनी कोणाकडून एका पैशाची मदत न घेता मेळाव्याचा सर्व अर्थिक भार उचलला.

**एव्हरग्रीन**

कार्यक्रमाचे आयोजन विदेश संचारचे माजी सेवानिवृत्त कर्मचारी एस. व्ही. उदास, अशोक कानिटकर, निजाम तांबोळी, एस. एस. वेदपाठक तसेच अंकुश बागल या उत्साही मंडळींनी केले. कार्यक्रमास फार छान प्रतिसाद मिळाला. सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. पी. जी. सरपोतदार व पी. एम. नारखेडे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. वर्षभरात दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमास सुरुवात झाली. आर. एम. कुंभार, ए. व्ही. जॉर्ज, अशोक बनसोडे हे विदेश संचारचे माजी अधिकारीही उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी आपल्या भाषणांतून भूतकाळातील आठवणींना उजाळा देत, त्यांना त्यांच्या कार्यकाळात सर्वांकडून कसे सहकार्य मिळाले व कार्यकाळ गोड कसा झाला हे थोडक्यात, मुद्देसूदपणे सांगितले. उपस्थितांनी पण आपली मनोगते प्रकट केली. या स्नेहमेळाव्यात भेटीगाठी व गप्पांव्यतिरिक्त इतर विषयांवर पण चर्चा झाली. निजाम तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले. एस. जी. सिन्नरकर यांनी आभार प्रदर्शन केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या स्नेहमेळाव्याची एक वाखणण्याजोगी गोष्ट म्हणजे येथे उतारवयातील व्याधी, दुःख, वेदना विसरून नुकतीच हृदयशस्त्रक्रिया झालेले कर्मचारी पण पाच मजले जिना चढून कार्यक्रमास उपस्थित होते. सकाळी घरच्या चिंतानी त्रासून आलेली सर्व मंडळी संध्याकाळी कळी खुलावी किंवा शक्तिवर्धक डोस मिळाल्यावर चेहरा उजळावा तसा प्रसन्न, हसरा चेहरा घेऊन परत पुढच्या स्नेहमेळाव्याला भेटण्याची उमेद ठेवून घरी परतले.

- रत्नाकर वाणी (९८२३७०७१३५)